|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

( पदवीप्रदान समारंभ-2023- भोजन समिती )

जावक क्रमांक:- कबचौउमवि/7-अ/भोजन समिती/दरपत्रक/650/2023 दिनांक :- 06.02.2023

## दरपत्रक सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा 31 वा पदवीप्रदान समारंभ 2023 (दीक्षांत समारंभ) दि.17.02.2023 रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. त्यासाठी चहा, अल्पोपहार (नाश्त्याच्या) व्यवस्थेसाठी खालील तपशीलात दर्शविलेल्या मेनुप्रमाणे प्रति प्लेट संख्येनुसार सेवा पुरविणाऱ्या पंजीकृत पुरवठादारांकडून सिलबंदरित्या दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | प्लेट नग- संख्या (अंदाजे) | दर प्रति प्लेट सर्व करांसह | एकूण रक्कम सर्व करांसह |
|---|---|---|---|---|
| 1 | अल्पोपहार (नाश्ता) उपमा-200 ग्रॅम व चहा (मिनरल वॉटरसह) | 400 | | |
| 2 | विद्यार्थ्यांकरिता फुड पॅकेट कचोरी- 2 नग (खटाईसह) खोबरा बर्फी-2 नग | 1000 | | |

**दरपत्रके सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तीची माहिती खालीलप्रमाणे. :-**

1. सदर दरपत्रक सुचनेनुसार सहभाग घेण्यासाठी अधिकृत नोंदणी असलेल्या पुरवठादाराची दरपत्रके स्विकारली जातील. त्यासाठी दरपत्रका सोबत शॉप ॲक्ट रजिष्ट्रेशनची/संस्थेची नोंदणी दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
2. पुरवठादाराने अन्न व औषध प्रशासन यांचेकडील परवान्याची प्रत जोडणी आवश्यक आहे.
3. पुरवठादाराने PAN CARDची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
4. पुरवठादाराने GST प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे. (आवश्यक असल्यास)
5. दरपत्रकात नमुद करावयाचे दर हे सर्व करांसह (GST सह) नमुद करण्यात यावेत. त्यासाठी स्वतंत्रपणे सिलबंद पाकीटात लेटरहेडवर सही, शिक्क्यानिशी दर नमुद करून सादर करावेत.
6. सशर्थ दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
7. सदरचे अल्पोपहार व फुड पॅकेटस् वाटप करावयाची व्यवस्था ही वेगवेगळ्या 2-3 ठिकाणी करावयाची असून त्यासाठी भोजन समिती सांगेल त्या ठिकाणी करणे पुरवठादारास आवश्यक राहिल.
8. सदरची व्यवस्था व साहित्य व स्वखर्चाने विद्यापीठाच्या परिसरात करावी लागेल.
9. कार्यक्रमाच्या स्थळी विद्यापीठ परिसरातील कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास संबंधित पुरवठादाराकडून वसुली करण्यात येईल.
10. कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता राखणे राखणे व करून देणे आवश्यक राहिल.
11. कार्यक्रमात शिल्लक राहिले खरकटे, इतर अनावश्यक पदार्थाची विद्यापीठ वसतीगृहातील जैविक कचरा मशीन्स मध्ये विल्हेवाट लावणे पुरवठादारा बंधनकारक राहिल.
12. स्वयंपाकासाठी लागणारी भांडी, इतर साहित्य , वाढपी, नोकरवर्ग यांची व्यवस्था पुरवठादाराने स्वत: करावी लागेल.
13. चहा,नाश्ता व फुड पॅकेट तयार करण्यासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करणे आवश्यक राहिल.
14. उपरोक्त कामी बाल कामगार नेमण्यात येऊ नयेत.
15. कार्यक्रमासाठी वापरण्यातयेणाऱ्या गॅस यंत्रणेची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहिल. स्वयंपाकाच्या ठिकाणी दुर्घटना घडल्यास होणाऱ्या संपुर्ण नुकसानीची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.